भिंगारमध्ये पारंपरिक कलगीतुऱ्याचा कार्यक्रम

१७० शाहिरांची उपस्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त भिंगार येथे ऐतिहासिक परंपरा असलेला, पारंपरिक कलगी-तुऱ्याचा कार्यक्रम रात्रभर रंगला. महाराष्ट्रातील १७० शाहिरांचा सवाल- जवाबांचा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. सुमारे साडेतीनशे वर्षांहून अधिक काळापासून भिंगारमध्ये कलगीतुऱ्याची परंपरा जपली जाते. भिंगार कलगीतुरा मंडळाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शारदीय नवरात्रोत्सवात भिंगार येथे जगदंबामातेची पालखी व पलंगाची भेट होते. त्या निमित्ताने हा कलगीतुरा कार्यक्रम दरवर्षी आयोजित केला जातो. शाहिरांचे



सवाल-जवाब, काव्यात्मक सादरीकरण, गवळणी, पोवाडे अशा आविष्काराने उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले. या माध्यमातून महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलेचा वारसा जपण्याचा प्रयत्न केला जातो.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या पत्नी शीतल जगताप, भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहायक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात व समाज कल्याण अधिकारी प्रियंका जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. भिंगार कलगीतुरा मंडळाचे अध्यक्ष भाऊसाहेब कर्डिले यांनी स्वागत केले. लोककलेवर प्रेम करणारे रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात कलगीवाले शाहीर म्हणून राजेंद्र निमसे, पाराजी पानसंबळ, रामभाऊ सरोदे, विश्वनाथ गोकुळे, बाळासाहेब बोरुडे, एकनाथ पवार आदींनी सहभाग घेतला तर तुरेवाले शाहीर म्हणून निजाम शेख, कान्हू सुंबे, विठ्ठल भांड, शिवाजीराव ठाणगे, सुभाषराव कावरे, दत्तात्रय झावरे, लक्ष्मण भामरे, शांताराम किंकर, शिवाजीराव वाणी, अण्णासाहेब चौरे, गणेश लोंढे, साहेबराव किंकर, जालिंदर भांड, लहू कदम आदींनी आपल्या कलाविष्कारातून रसिकांची दाद मिळवली.

शाहिरांनी गवळणी, पोवाडे, कविता, पारंपरिक सवाल-जबाबच्या माध्यमातून लोककलेचे विविध पैलू सादर केले. या सादरीकरणात मराठी लोकपरंपरेचे शब्दवैभव, काव्य प्रतिभा आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडले. या कार्यक्रमातून ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

कलगीतुरा कार्यक्रमासाठी रूपेश भंडारी, रावसाहेब कोकणे, राजू अतार, महेश झोडगे, रवी फल्ले, दीपक लिपाने, अक्षय नागपुरे, राजू परदेशी, आदित्य दिवटे, संदीप फटांगरे, सार्थक साठे, मयंक कर्डिले, कृष्णा फटांगरे आदींनी परिश्रम घेतले.

साखर कारखानदारी अडचणीत; राज्य सरकारने मदत करावी

काँग्रेसचे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची अपेक्षा



लोकासत्ता वार्ताहर

संगमनेर: साखर कारखान्यांची संख्या आणि प्रत्येक कारखान्याने आपली क्षमताही वाढवलेली आहे. मात्र सध्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे साखर कारखानदारी अडचणीत आली आहे. अशा संकटाच्या परिस्थितीत सरकारने साखर कारखानदारीला मदत करावी. तातडीने निर्णय घेऊन कारखानदारीसह शेतकरी, शेतमजूर, महिला व सर्वसामान्यांना दिलासा द्यावा असे आवाहन काँग्रेसचे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या आज, बुधवारी झालेल्या ६० व्या गळीत हंगाम शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, कांचनताई थोरात, दुर्गाताई तांबे, कारखान्याचे उपाध्यक्ष पांडुरंग घुले, ॲड. माधव कानवडे, गणपत सांगळे, बाबा ओहोळ, रणजीतसिंह देशमुख, डॉ. जयश्री थोरात, शंकरराव खेमनर, शरद थोरात, रामहरी कातोरे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर आदी उपस्थित होते.

यावेळी थोरात म्हणाले, कमी दिवसांमध्ये जास्त गाळप करण्याकरता कारखान्यांनी आपली क्षमता वाढवली आहे. दिवसेंदिवस उसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. कारखान्यांमध्ये उसाची जीवघेणी स्पर्धा निर्माण झाली आहे.

थोरात कारखान्याचे ९ हजार मेट्रिक टन क्षमतेच्या विस्तारीकरणाचे करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. अवघड परिस्थितीतही यावर्षी ११ लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट आहे. कार्यक्षेत्रात हक्काचा ऊस वाढवणे अत्यंत गरजेचे आहे. कारखान्याकडून ऊस उत्पादकांना यावर्षीही चांगला भाव मिळेल. कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादकांना २०० रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले. प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले. उपाध्यक्ष घुले यांनी आभार मानले.

दिवाळीनिमित्त कामगारांना बोनस, अनुदान जाहीर

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांना नेहमीच उच्चांकी ऊसदर दिला आहे. कारखान्यांमध्ये कामगारांचे योगदान मोलाचे आहे. त्यामुळेच दरवर्षीप्रमाणे दिवाळीनिमित्त यावर्षीही कामगारांना २० टक्के बोनस व ३० दिवसांचे अनुग्रह अनुदान दिले जाणार असल्याची घोषणा थोरात यांनी केली.

दुष्काळामुळे सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांना स्थगिती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी जिल्हा नियोजन समितीअंतर्गत (डीपीसी) घेतली जात असलेली सिमेंट रस्त्यांची कामे आगामी काळात स्थगित ठेवण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाच्या उपसमितीने घेतला आहे. या संदर्भातील कार्यवाहीचे निर्देश मुख्य सचिवांच्या स्तरावरून नियोजन विभागामार्फत देण्यात आले आहेत.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा अपव्य टाळून काटकसरीने वापर करण्यासाठी राज्य सरकारने अनेक आदेश दिले आहेत. त्या अंतर्गत सिमेंट रस्त्यांची कामे स्थगित ठेवण्याचेही आदेश दिले आहेत. मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक २९ सप्टेंबरला झाली. त्यानंतर हे आदेश देण्यात आले आहेत.

राज्यातील अनेक भागात शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर केली आहे. पाणीबचतीसह टंचाई निवारण्यासाठी तसेच चारा उत्पादनासाठी, विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी निधी वळवला जाऊ लागला आहे. दुष्काळात पाण्याचा अपव्यय होऊ नये म्हणून राज्य सरकारने कठोर निर्णय घेण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतील सिमेंट रस्त्यांची कामे स्थगित ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थितीत निधीचा वापर पाणीपुरवठा व अत्यावश्यक कामांसाठी कारण्यावर भर देण्याचे आदेश आहेत.

सिमेंटच्या रस्त्यांच्या कामासाठी तुलनेत मोठ्या प्रमाणावर पाणी लागते. यंदा पावसाने पाठ फिरवल्याने राज्यात ऑगस्टपासूनच पाणीटंचाईचे संकट उभे राहिले आहे. धरणात पाणीसाठा काही प्रमाणात शिल्लक असला तरी लाभक्षेत्रात पुरेसा पाऊस न झाल्याने पाणीटंचाई निर्माण झाली आहे गाव तलाव बंधारे कोरडेठाक पडू लागले आहेत. पाणी योजनांचे जलस्रोतही आटू लागले आहेत. धरणातील उपलब्ध पाणीसाठे ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्यासाठी आरक्षित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अलीकडच्या गेल्या काही वर्षात राज्य सरकार स्थानिक स्वराज्य संस्था डांबरी रस्ते तयार करण्याऐवजी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांना प्राधान्य देत आहे. नगर शहरातही सुमारे दीडशे कोटी रुपये खर्चून २४ रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यातील १८ रस्त्यांची कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामे सध्या सुरू आहेत. अनेक राष्ट्रीय महामार्गही सिमेंट काँक्रीटचे केले जात आहेत.

राज्य सरकारने नवीन सिमेंट रस्ते करण्यास स्थगिती दिलेली आहे. मात्र सध्या चालू असलेल्या सिमेंट रस्त्यांची कामे पुढे सुरू ठेवावीत की नाही याबाबत मात्र आदेशात कोणतीही बाब नमूद केलेली नाही. त्यामुळे संबंधित ठेकेदार व अधिकारीही संभ्रमात असल्याचे समजले.

महापालिका प्रवेशद्वारात सेवानिवृत्तांचा हलगीनाद!

प्रलंबित मागण्यासाठी धरणे



लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : महापालिकेतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक, सहाव्या वेतन आयोगाचे प्रलंबित आठ हप्ते आणि दरमहा वेळेवर निवृत्ती वेतन मिळावे, या प्रमुख मागण्यांसाठी कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ संलग्न अहिल्यानगर जिल्हा नगरपालिका व महापालिका पेन्शनर असोसिएशने महापालिकेच्या प्रवेशद्वारात धरणे आंदोलन सुरू केले आहे. आज, बुधवारी आंदोलकांनी हलगी वाजवून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. हलगीच्या कडकडाटासह केलेल्या निदर्शनांतून सेवानिवृत्तांनी आवाज उठविला.

संघटनेचे अध्यक्ष एन. एम. पवळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू असून, न्यायालयीन निर्णयानुसार महापालिकेतील ५०६ सेवानिवृत्तांना पाचव्या वेतन आयोगाचा थकीत फरक अद्याप मिळालेली नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. या आंदोलनात संघटनेचे पदाधिकारी वसंत थोरात, मिलिंद वैद्य, डी. यू. देशमुख, रंगनाथ गावडे, संजीव परशरामी, मधुकर खताळ, शेखर वैद्य, अन्वर शेख, मुस्ताक शेख, अनिस खान, सतीश वाघ, मंजूर शेख, गुरु टेपाळे, ज्ञानेश्वर धिरडे, दिलीप पाठक, नंदू डापसे, राजेंद्र सस्कर, रवी भारताळ, सुधाकर काशिद, हिरामन जाधव, आर.बी. कदम, गोरक्षनाथ तेलोरे, अरुण घोडबंदर, प्रमोद मुळे आदी सहभागी झाले आहेत. आमदार संग्राम जगताप, माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन संघटनेच्या मागण्यांना पाठिंबा दिला.

न्यायालयीन निर्णयानुसार देय असलेली रक्कम प्रशासनाने विनाविलंब अदा करावी, अशी संघटनेची मागणी आहे. सहाव्या वेतन आयोगाचे आठ हप्त्यांची एकूण रक्कम ६० ते ६५ लाख रुपये असल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले.

दिवाळी सण जवळ आल्याने जीवनावश्यक खर्चासाठी सेवानिवृत्तांना पैशांची गरज आहे. अशा परिस्थितीत थकीत वेतन फरक आणि प्रलंबित हप्ते मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. हक्काची रक्कम मिळविण्यासाठी सणासुदीच्या काळात आंदोलन करावे लागत असल्याची खंतही यावेळी व्यक्त करण्यात आली.

श्री संत माउली पतसंस्थेच्या अध्यक्षाला नाशिकमधून अटक

अहिल्यानगर : जादा व्याज देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल झालेल्या श्री संत माउली क्रेडिट सोसायटीचा अध्यक्ष सुनील बाबासाहेब शिरसाठ (वय २६, रा. जोडमोहज, पाथर्डी, सध्या तिसगाव, पाथर्डी) याला पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने नाशिक येथे अटक केली. त्याला न्यायालयाने पाच दिवसांची (दि. १९) पोलीस कोठडी सुनावली.

अटकेच्या वेळी आरोपी शिरसाठ याने इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील गॅलरीत जाऊन आत्महत्येची धमकी दिल्याने पोलिसांसमोर पेच निर्माण झाला होता. नगर-नाशिक पोलिसांनी अग्निशामक दलाच्या मदतीने त्याची सुखरूप सुटका करून त्याला ताब्यात घेतले.

श्री संत माउली क्रेडिट सोसायटीचा अध्यक्ष सुनील शिरसाठ आणि संचालक मंडळाविरुद्ध गुंतवणूकदारांची जादा व्याजदाराचे आमिष दाखवून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल आहे. तारण ठेवलेले सोन्याचे दागिने परत न देऊनही फसवणूक केल्याचा आरोप आहे. श्री संत माउली क्रेडिट सोसायटीच्या पाथर्डी, शेवगाव आणि नेवासा तालुक्यात शाखा होत्या. पाथर्डीत गुन्हा दाखल झाल्यानंतर सुनील शिरसाठ पसार झाला. त्याच्याविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस शिरसाठचा शोध घेत असताना तो नाशिक येथे असल्याची माहिती मिळाली. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याशी संपर्क साधला. आयुक्त कर्णिक यांनी गुन्हे शाखेचे सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार नाशिक पोलिसांनी एका इमारतीत जाऊन शिरसाठला ताब्यात घेण्याची कारवाई केली.

आत्महत्या करण्याची धमकी

पोलिसांची चाहूल लागताच सुनील शिरसाठने तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅटच्या गॅलरीत जाऊन दरवाजा बंद केला. पोलिसांनी ताब्यात घेतल्यास आत्महत्या करण्याची धमकी त्याने दिली. त्यामुळे पोलिसांसमोर त्याला सुरक्षितपणे ताब्यात घेण्याचे आव्हान उभे राहिले. पोलिसांनी घाई न करता प्रसंगावधान राखले आणि अग्निशामक दलाला पाचारण केले. अग्निशामक दलाच्या मदतीने शिरसाठची सुखरूप सुटका करण्यात आली. त्यानंतर त्याला ताब्यात घेऊन अहिल्यानगर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या हवाली केले. या कारवाईत दोन्ही जिल्ह्यांतील पोलिसांचा समन्वय महत्त्वाचा ठरला.

दुष्काळी भागातील उसाचेही पंचनामे करा – भरणे



लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : पावसाचा दीर्घ खंड आणि पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे नुकसान झालेल्या ऊस पिकांचेही पंचनामे करण्यात येणार आहेत. याबाबत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत. आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी केलेल्या मागणीची दखल घेत हा निर्णय घेण्यात आला. मंत्रालयात कृषिमंत्र्यांना या मागणीचे निवेदन देताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे उपस्थित होते.

राज्यातील अनेक भागांत पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने ऊस उत्पादक शेतकरी संकटात सापडले आहेत. पाण्याअभावी ऊसाची वाढ खुंटली असून, पिकाची उंची, जाडी आणि वजन घटल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. ऊस पूर्णपणे वाळला नसला, तरी वाढ खुंटल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार लंघे यांनी दुष्काळामुळे नुकसान झालेल्या ऊस पिकांचाही पंचनाम्यांत समावेश करण्याची मागणी केली.

केवळ पूर्णपणे वाळलेल्या किंवा नष्ट झालेल्या पिकांपुरते पंचनामे मर्यादित न ठेवता, पाण्याअभावी वाढ खुंटलेल्या, जाडी व वजन कमी झालेल्या आणि उत्पादन घटण्याची शक्यता असलेल्या ऊस पिकांच्या नुकसानीचीही नोंद घ्यावी, असे त्यांनी निवेदनात म्हटले.

नुकसानग्रस्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लागू निकषांनुसार आर्थिक मदत द्यावी किंवा त्यासाठी विशेष शासन निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. या मागणीची दखल घेत कृषिमंत्री भरणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पंचनामे करण्याचे निर्देश दिले.

मध्य रेल्वे

निर्माण संघटन

Open E-Tender Notice Number.: No. SUR-NC-CR-SNT-C-S-03-2027 dtd 12.10.2026

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी उपमुख्य सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (निर्माण), पुणे, मध्य रेल्वे, पुणे हे खालील कामासाठी वेबसाईट **www.ireps.gov.in** याद्वारे खुली ई-निविदा आमंत्रित करत आहेः **ई-निविदा क्रमांकः** एसयूआर-एनसी-सीआर-एसएनटी-सी-एस-03-2027. **कामाचे नावः** मध्य रेल्वेच्या औरंगाबाद-अनकाई सेक्शन दरम्यान दुहेरीकरणासंदर्भात अंकाई स्टेशनवरील यार्डच्या पुनर्रचनेसाठी इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगमध्ये बदल करण्याकरिता इनडोअर आणि आउटडोअर सिग्नलिंग कामाचा पुरवठा, चाचणी आणि कार्यान्वयन करणे. **कामाचे मूल्यः** रु. 5,77,36,872.98. **इसारा ठेव अनामत रक्कम (ईएमडी):** रु. 11,54,700/-. **निविदा अर्जाची किंमतः** रु. शून्य. **पूर्णत्वाचा कालावधीः** 11 महिने. **देखभालीचा कालावधीः** 12 महिने. **टीपः (1)** इच्छुक निविदाकारांना विनंती आहे की, निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी वेळोवेळी निविदेच्या सर्व तपशिलांसाठी वेबसाईट **https://www.ireps.gov.in** याला भेट द्यावी आणि काही बदल/अद्यतने/दुरुस्त्या जर असल्यास त्यांची नोंद घ्यावी. निविदाकारांनी केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच सहभागी व्हावे. **(2)** वर नमूद केलेली ई-निविदा दि. 30.10.2026 पासून ते दि. 13.11.2026 रोजी 15.00 वाजेपर्यंत वेबसाईट **https://www.ireps.gov.in** यावर बोली सादर करण्यासाठी उपलब्ध असेल. **(3)** कोणत्याही चौकशीसाठी, आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधा - विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता, 1ला मजला, उप मुख्य अभियंता (निर्माण), पुणे कार्यालय, प्रायव्हेट रोड, हॉटेल शेरेटन ग्रँडजवळ (जुने ले-मेरिडियन), मध्य रेल्वे, पुणे- 411001 किंवा फोन क्र. 020-26105880/26105892 यावर.

EXP - 52 उप मु. सं. आणि दूर. अभि. (निर्माण), पुणे

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ,जामखेड

भवर बिल्डिंग, पहिला मजला, तपनेश्वर रोड, जामखेड, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर

प्रारुप मतदार यादीचा कार्यक्रम (फक्त सभासदांकरीता)

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे सुधारीत नियम ६ ते १० मधील तरतुदीनुसार **ज्योती क्रांती ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., जवळा, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर** या क वर्गातील संस्थेच्या संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणूक सन २०२६-२७ ते २०३१-३२ करीता प्रारुप मतदार यादी अंतिम करणेचा कार्यक्रम **दि. १५/१०/२०२६** पासून सुरु होत असून सविस्तर कार्यक्रम व प्रारुप मतदार यादी या कार्यालयाच्या, संबंधित संस्थेच्या नोटीस बोर्डावर आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ https://scea.maharashtra.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी सर्व सभासदांनी याची नोंद घ्यावी.

दिलीप तिजोरे

तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जामखेड

pnb Housing Finance Limited

नोंदणीकृत कार्यालयः 9 वा मजला, अंतरीक्ष भवन, 22, के.जी. मार्ग, नवी दिल्ली- 110001, फोनः011-23357171,23357172,23705414, वेबसाईटः www.pnbhousing.com

शाखेचा पत्ताः अहमदनगरः क्र. 203, दुसरा मजला, साई मिडास टच बिल्डिंग, नगर-मनमड रोड, सावेडी, पंचशील हॉटेलजवळ, अहमदनगर - 414003, महाराष्ट्र.

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि. यांचे अधिकृत अधिकारी आहेत त्यांनी सिक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट इन्फोर्समेंट कायदा, 2002 च्या नियम 8(1) चे पालन करुन आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम 2002 च्या नियम 3 सहवाचता निर्देशित कलम 13(12) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या तारखेला मागणी नोटीस जारी केली आहे ज्यामध्ये संबंधित कर्जदाराला सूचना मिळाल्याच्या तारखेपासून/सूचना मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेली रक्कम परत करण्याचे आवाहन केले आहे. कर्जदार रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी निर्देशित नियमांच्या नियम 8 सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून प्रत्येक खात्यासमोर नमूद केलेल्या तारखांना खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची खबरदारी देण्यात आली आहे आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार हा कर्ज करारानुसार रक्कम आणि त्यावरील व्याजासाठी पीएनबी हाऊसिंग फायनान्स लि., यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, निर्देशित कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधले जात आहे.

कर्ज खाते क्र.	कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार /कायदेशीर वारसांचे नाव	मागणी सूचना तारीख	मागणी सूचनेच्या तारखेनुसार थकबाकी रक्कम	ताब्यात घेतल्याची तारीख	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन
एचओयू/एएचएमडी /1118/611016 बी.ओ.: अहमदनगर	श्री.नितीश भाऊसाहेब केदारी / श्रीमती नीता गोविंद गोपाळे	13-जुलै-2026	रु. 24,79,530.10/- (रुपये चोवीस लाख एकोणऐंशी हजार पाचशे तीस आणि दहा पैसे फक्त)	09.10.2026 (प्रतिकात्मक)	रो ब्लॉक क्र 1, प्लॉट नं 4, अ. क्र. 50 2ए1 50 आणि, 2ए 250 आणि 2बी 2 50 आणि 3बी, जुना अ. क्र. 60 2ए1 60 2ए2 60 2बी2 60 3बी, महिंद्रा शोरूमजवळ, नवनगपूर, अहमदनगर, महाराष्ट्र- 414111

ठिकाणः- अहमदनगर, दिनांकः- 14.10.2026 सही/-, अधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया Central Bank of India

"CENTRAL" TO YOU SINCE 1911

एम आय डी कॉर्पोरेट फायनास ब्रांच, पुणे

तळ मजला, ३१७, महात्मा गांधी रोड, पुणे- ४११००१.

दूरध्वनी- ०२०-२६०५४६९३

अचल मालमत्ता विक्रीसाठी ई-लिलावाची विक्री नोटीस

सिक्युरिटायझेशन अँड अरिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनानशीयल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ व सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ मधील नियम ८(६) अन्वये ई लिलाव विक्रीची नोटीस.

तमाम जनतेस, खासकरुन कर्जदार आणि जामिनदार यांना जाहीर नोटीस देण्यात येते की खाली नमूद केलेली व तारणावर कर्ज देणारी संस्था **सेंट्रल बँक ऑफ इंडिया** यांच्या अधिकृत अधिकारी यांनी आपल्या **प्रत्यक्ष/प्रतिकात्मक ताब्यात** घेतलेल्या तारण मिळकतीची जशी आहे तशी, जे काही आहे ते **(फर्निचर, फिक्स्चर, स्टॉक चल चीज वस्तु सोडून) या तत्वावर दिनांक ०३.११.२०२६ रोजी ऑन लाईन वेब पोर्टल https://baanknet.com** वरुन खाली नमूद मेलेल्या कर्जदार, जामीनदार, गहाणखत लिहून देणार यांचेकडून **सेंट्रल बँक ऑफ इंडिया** यांना देणे असलेली कर्ज रक्कम वसूल करण्यासाठी विक्री करण्यात येत आहे. मिळकतीसाठीची राखीव किंमत, बयाणा रक्कम आणि अन्य तपशील खालील तक्त्यात दिला आहे. लिलाव प्रक्रियेच्या अधिक तपशी, अटी व शर्तीसाठी बँकेस सेवा पुरविणाऱ्या संस्थेने उपलब्ध केलेल्या **www.centralbank.bank.in.** या संकेत स्थळाला भेट द्यावी.

इच्छुक बोलीदारांनी निविदापूर्व बयाणा रक्कम **पीएसबी अलायन्स ई-बिक्रय वॅलेट (PSB Alliance e-Bkray wallet.)** द्वारा जमा करावयाची आहे. इच्छुक बोलीदाराने लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी लिलाव प्रक्रियेपूर्वी पुरेशा कालावधीत ई वॅलेटद्वारा रक्कम जमा करावयाची आहे, म्हणजे शेवटच्या क्षणी कोणतीही अडचण होणार नाही.

कर्जदार/ जामिनदार/ गहाणखतदार यांचे नाव	येणे रक्कम	मिळकतीचा तपशील/ इतर बोजा	राखीव किंमत / (ईएमडी)/ बोलीवाढ रक्कम	संभाव्य बोलीदारांकरीता निरीक्षण दिनांक आणि संबधीत अधिकारी
कर्जदारः मेसर्स भांगे ऑरगॅनिक केमिकल्स प्रा. लि. जामीनदारः श्री. संजय भाऊसाहेब भांगे, सौ. सुलभाबाई भाऊसाहेब भांगे, श्री. राजेंद्र भाऊसाहेब भांगे व श्री. प्रजीवकुमार भाऊसाहेब भणगे.	रु. ८,३४,५५,१२९.०० (रुपये आठ कोटी चौतीस लाख पंचावन्न हजार एकशे एकोणतीस फक्त) अधिक दि. १४.१०.२०२६ पासूनचे पुढील व्याज, खर्च, शुल्क इ.	गाव शिरसगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर ४१३७०९ येथील साईशक्ती पार्क, साई हॉस्पिटल मागे, नेवासा रोड, कृष्ण मंदिराजवळ, गट नं. ४८/३० मधील स्टिल्ट ग्राउंड फ्लोअर वरील सौ. स्मिता संजय भांगे यांच्या मालकीचा निवासी फ्लॅट नं. ०२. बिल्ट अप क्षेत्र ९१७.७४ चौ. फूट. बोजा असल्यास- बँकेस माहीत नाही. प्रत्यक्ष ताबा	रु. २३,८७,०००.०० रु. २,३८,७००.०० रु. १०,०००/-	दि. २३.१०.२०२६ श्री. राम कृष्ण मो. ९३७२२६८०३६

ही नोटीस, कर्जदार आणि जामीनदार यांना सदर सिक्युरिटी इंटरेस्ट इंटरेस्ट(एन्फोर्समेंट) नियमांमधील नियम ८(६)/९(१) अन्वये वरील तारखेस होत असलेल्या ई लिलावाबाबतची नोटीस आहे असेही समजले जावे.ई लिलाव विक्री मध्ये सहभागी होवू इच्छिणारे बोलीदार यांनी सेवा पुरवठादार यांच्या **https://baanknet.com** या संकेतस्थळावर पुरेशा वेळेपूर्वी आपली नोंद करावी आणि आवश्यक तो आयडी आणि पासवर्ड प्राप्त करावा. इच्छुक बोलीदाराने केवळ पासवर्ड बदलावा. याबाबतच्या शैक्षणिक दृकश्राव्य (व्हिडियो) प्रशिक्षणासाठी **https://baanknet.com** या संकेत स्थळाला भेट द्यावी. लिलाव प्रक्रियेच्या अधिक माहिती, अटी व शर्तीसाठी **www.centralbank.bank.in.** या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक बोलीदार आपली नोंदणी या संकेतस्थळावर करतील आणि त्यावरुन आपली के.वाय.सी. कागदपत्रे सादर करतील आणि के.वाय.सी. कागदपत्रांची तपासणी झाल्यावर बयाणा रक्कम ई वॅलेट वर एनईएफटी/ट्रान्सफर **(https://baanknet.com** यावरुन चलन फॉर्म मिळवून) जमा करतील. **अधिक माहिती व तपशीलासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया, विभागीय कार्यालय, पुणे, मुख्य व्यवस्थापक, वसुली यांचेशी मोबाईल क्र. ७९९२२४८७११ किंवा सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सहायक महाव्यवस्थापक, एमसीबी शाखा, पुणे यांचेशी ९३७२२६८०३६ या मोबाईल** क्रमांकाशी संपर्क करावा. लिलावाच्या अटी व शर्ती केवळ सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट)नियम २००२ मधील तरतुदीनुसारच असतील.

'सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रूल्स २००२' च्या नियम ८(६)/नियम ९(१) अन्वये मालमत्तांसाठी १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना.

दि. १४.१०.२०२६ स्थळ: पुणे

(मजकूरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा)

अधिकृत अधिकारी सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया

श्रीरामपूर नगरपरिषद,श्रीरामपूर

जि. अहिल्यानगर ४१३ ७०९

दूरध्वनी क्र. (०२४२२) २२२१५४, २२२१५५, २२२७३१

e-mail-coshrirampur@gmail.com website-www.shrirampur.org.in

जा.क्र./कर विभाग/१७/९/२०२६ दि. १४/१०/२०२६

जाहीर सूचना

श्रीरामपूर शहर हद्दीतील तमाम नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीतील सर्व मालमत्ता (जमीन व इमारती) करिता सन २०२६-२७ ते २०२९-३० या कालावधीच्या मुल्यनिर्धारणाच्या अंतिम कर आकारणी याद्या मा. सहाय्यक संचालक, नगररचनाकार, नगररचना विभाग श्रीरामपूर यांनी हरकत सुनावणीअंती तपासणी करुन अंतिमरित्या अधिप्रमाणित केलेल्या आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२१(२) व १२४ नुसार अंतिम कर मुल्यनिर्धारण याद्या मालमत्ता धारकांच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ याद्वारे जाहीररित्या प्रसिध्द करण्यात येत असून सदर याद्या नगरपरिषदेच्या कर विभागामध्ये सर्व संबंधित मालमत्ता धारकास, भोगवटा धारकास व त्यांच्या अभिकर्त्यास नगरपरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध असतील.

(श्री. मनोज उकिर्डे) मुख्याधिकारी — (सौ. कांचन सानप) उपाध्यक्ष — (श्री. करण ससाणे) नगराध्यक्ष

श्रीरामपूर नगर परिषद, श्रीरामपूर

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट - IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

शाखा अहमदनगर : युनिट क्र - 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ- सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर खाली नमूद तपशीलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रूल्स, 2002 मधील नियम - 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाइटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन कज्जे (के)
HOU/AHMD/1021/919386, देविदास अंसीराम डहाळे / सारिका देविदास डहाळे, शाखा : अहमदनगर	रु. 18,00,820.69 आणि 14-10-2025	प्रत्यक्ष ताबा	स क्र 61/2ई, प्लॉट क्र 51 ते 55/4 पी, उत्तर बाजू, रो ब्लॉक क्र बी, पारस कंपनीच्या मागे, मोरया पार्क, बोल्हेगाव, अहमद नगर, महाराष्ट्र - 414111, अहमदनगर, भारत.	रु. 15,38,000	रु. 1,53,800	19/11/2026	रु. 10,000	27-10-2026 दु. 12 ते दु. 4	20-11-2026 दु. 2 ते दु. 3	ज्ञात नाही
HOU/AHMD/1121/926217, विलास दानियाल गायकवाड / माया विलास गायकवाड, शाखा : अहमदनगर	रु. 14,32,111.94 आणि 20-09-2025	प्रत्यक्ष ताबा	स क्र 70/1ए, प्लॉट क्र 16/17/2, रो ब्लॉक क्र 2ए, उमा मारुती मंदिरा जवळ, गांधी नगर, बोल्हेगाव, अहमद नगर, महाराष्ट्र - 414111, अहमदनगर, भारत.	रु. 15,10,000	रु. 1,51,000	19/11/2026	रु. 10,000	29-10-2026 दु. 12 ते दु. 4	20-11-2026 दु. 2 ते दु. 3	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करुन घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल मालमत्ता / अनामत मत्तेचे पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. - 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

ठिकाण :- अहमदनगर, दिनांक :- 15.10.2026 स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड